## पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक २५.०३.२०१७<br>०३.०० |
|---|---|---|

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :—औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

याव्दारे आपणास सुचित करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक २४.०३.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे चिकलठाणा:—** गुरन I ११७/१७ कलम ४५४ ३८० ३४ भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे सिताराम विश्वनाथ बिराजदार वय ६५ वर्ष व्यवसाय पुजारी रा. कचनेर ता.जि. औरंगाबाद यांनी फिर्याद दिली की यातील आरोपी नामे १) नवनाथ बबन मोरे २) अमोल काशीनाथ पवार दोन्ही रा. कचनेर ता.जि. औरंगाबाद यांनी संगनमत करून फिर्यादीचे रूमचा पत्रा उचकटवुन आत प्रवेश करून घरातील रोख रक्कम पंचधातुच्या मुर्त्या पितळी घंटा पंच धातुचे कडे व तांब्याच्या दोन घागरी असा एकुण ३८४००/—रू. कि. च्या वस्तु लबाडीचे इरादयाने चोरून नेले म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. लोखंडे पोउपनि पोस्टे चिकलठाणा हे करीत आहे.

**०२) पोस्टे अजिंठा:—** गुरन I ९८/१७ कलम ३०४(अ) २७९ भादवि सहकलम १३४/१७७ मोवाका नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे रमेश विनायकराव घोडे वय ४५ वर्ष व्यवसाय शेती रा. गोसेगाव ता. भोकरदन जि. जालना यांनी फिर्याद दिली की यातील अज्ञात लोडींग ट्रक चे चालकाने त्याचे ताब्यातील लोडींग ट्रक हि भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन टाटा टेम्पो क्रं. एमएच ०२ टी ७४९५ हिला उजवे बाजुने फाळक्याजवळ धडक देवुन यातील मयत नामे अनिल विनायक घोडे वय २० वर्ष रा. गोसेगाव ता. भोकरदन जि. जालना यास किरकोळ व गंभीर जखमी

करून त्याचे मरणास कारणीभुत झाला व अपघाताची खबर न देता निघुन गेला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास मपोह/१२२६ वाकीकर पोस्टे अजिंठा हे करीत आहे.

**०३) पोस्टे बिडकीन:–** गुरन । १०१/१७ कलम ३७९ भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे मोहम्मद सिध्दीकी रब्बान सादीक खॉन वय ६० वर्ष व्यवसाय व्यापार रा. मोतीलाल नगर औरंगाबाद यांनी फिर्याद दिली की यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने बिडकीन शिवार शेत गट नं. २५१ मध्ये एन ए ४४ लेआउट मधिल पोल वरील ४३२० फुट अॅल्युमिनीयमची तार किं. १ लाख २५ हजार रूपये कट करून लबाडीचे इरादयाने चोरून नेली म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास सफौ शिंदे पोस्टे बिडकीन हे करीत आहे.

**स्वाक्षरीत**
**पोलीस अधिक्षक**
**औरंगाबाद ग्रामीण करीता**

**श्री सफौ जाधव नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण**